भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

प्रस्तावना :-

**विषय :- केंद्रशासन पुरस्कृत PM-E-BUS सेवा अंतर्गत बसडेपो तयार करणेकामी स्थापत्य कामे करणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्राकीय रक्कम रु. १८,८३,५०,४८९/- करिता पहिली फेर ई-निविदा सुचना क्र. ८५ /२०२४-२५, टेंडर नं. १०९२५७९ दिनांक २५/०९/२०२४ ते ०३/१०/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामी १ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन परिपत्रक क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक २९/०१/२०१९ नुसार शासन परिपत्रकातील परिशिष्ट क्र. १ नुसार दि.०४/१०/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली. सदरच्या निविदांचे छाननी अंती दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे निविदा समितीने निविदा पात्र ठरविण्यात आली. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक १५/१०/२०२४ रोजी दु. ११.०१ मि.उघडण्यात आली असून एकूण प्राप्त १ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.ॲकोर्ड, असोसिएट्स, उल्हासनगर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०६० टक्के कमी दराने | १८,२५,८६,९६३.५० |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार मे.ॲकोर्ड, असोसिएट्स, उल्हासनगर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०६० टक्के कमी दराने रक्कम रुपये. १८,२५,८६,९६३/- (अक्षरी-अठरा कोटी पंचवीस लाख शहाऐंशी हजार नऊशे त्रेसष्ठ ) मात्र इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ६६५ **दिनांक :-** १४/१० **/२०२४**

मे.ॲकोर्ड असोसिएट्स, उल्हासनगर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०६० टक्के कमी दराने रक्कम रुपये. १८,२५,८६,९६३/- (अक्षरी-अठरा कोटी पंचवीस लाख शहाऐंशी हजार नऊशे त्रेसष्ठ ) मात्रच्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, केंद्रशासन पुरस्कृत PM-E-BUS सेवा अंतर्गत बसडेपो तयार करणेकामी स्थापत्य कामे करणे या कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.ॲकोर्ड असोसिएट्स, उल्हासनगर यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**